भारताने दुसरा सामना ३३६ धावांनी जिंकला

आकाशदीपने गाजवला पाचवा दिवस

■ बर्मिंगहॅम । वृत्तसंस्था

भारताने इंग्लंड विरूध्दचा दुसरा सामना जिंकत मालिकेत बरोबरी केली आहे.पाचवा दिवस भारताचा गोलंदाज आकाशदिपने गाजवला. त्याने सहा गडी बाद केले आणि हा सामना ३३६ धावांनी जिंकला.

पहिल्या डावात भारताने ५८७ धावा केल्या होत्या. पण इंग्लंडने पहिल्या डावात भारताच्या गोलंदाजांना जेरीस आणलं. तसेच फॉलोऑनचं संकट टाळलं आणि ४०७ धावा केल्या. यामुळे भारताचा फॉलोऑनचा प्लान फसला. भारताकडे पहिल्या डावात १८० धावांची मजबूत आघाडी होती. मात्र असं असूनही भारताने दुसऱ्या डावात फलंदाजी करताना सावध भूमिका घेतली. भारताने दुसऱ्या डावात ६ विकेट गमवून ४२७ धावा केल्या आणि डाव घोषित केला. भारताने १८० धावांची बेरीज करत ६०८ धावांचं मजबूत आव्हान दिलं.

भारताने पाचव्या दिवशीचा खेळ सुरु झाला तेव्हा झटपट दोन विकेट घेतल्या. त्यानंतर टी ब्रेकआधी शेवटच्या चेंडूवर बेन स्टोक्सची विकेट काढली. त्यामुळे आता भारतीय संघ विजयापासून ४ विकेट दूर होता.

बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टनच्या मैदानात रंगलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडला बॅकफूटवर ढकलले . पाचव्या आणि अखेरच्या दिवसाच्या खेळातील पहिल्या सत्रात टीम इंडियाने इंग्लंडच्या संघाच्या ३ विकेट्स घेत इंग्लंडची अवस्था ६ बाद १५३ अशी केली होती. लंच ब्रेक आधी वॉशिंग्टन सुंदरनं इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याला पायचित करत संघाला सहावे यश मिळवून दिले. आकाश दीप आणि मोहम्मद सिराज यांनी गोलंदाजीची धूरा सांभाळल्यावर फिरकीपटूला मिळालेली या सामन्यातील ही पहिली विकेट ठरली.

पावसाच्या व्यत्ययामुळे पाचव्या दिवसाचा खेळ उशीरा सुरु झाला. ८० षटकात ७ विकेट्स घेण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्या भारतीय संघाला आकाश दीपनं पहिल्या अर्ध्या तासातच दोन विकेट्स मिळवून दिल्या. अवघ्या ८३ धावांवर इंग्लंडचा अर्धा संघ तंबूत परतला. संघ अडचणीत असताना कर्णधार बेन स्टोक्स आणि जेमी स्मिथ या जोडीनं एक दमदार भागीदारी रचली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ७० धावांची खेळी केली. मग पिक्चरमध्ये आला वॉशिंग्टन सुंदर ही जोडी सेट झाली, असताना वॉशिंग्टन सुंदर पिक्चरमध्ये आला. लंच ब्रेकआधीच्या शेवटच्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर त्याने बेन स्टोक्सला पायचित केले. वॉशिंग्टन सुंदर अन् विकेट किपर रिषभ पंतच्या अपीलनंतर मैदानातील पंचांनी स्टोक्सला आउट दिले. पण आश्चर्यचकित होत इंग्लंड कर्णधाराने ऊठड घेतला. टेलिव्हिजन अंपायरनं मैदानातील पंचाचा निर्णय कायम ठेवला अन् इंग्लंडच्या संघाने इंग्लंड कर्णधाराच्या रुपात १५३ धावांवर सहावी विकेट गमावली. बेन स्टोक्स ७३ चेंडूत ६ चौकाराच्या मदतीने ३३ धावा करून तंबूत परतला.

श्री त्रिविक्रमाच्या दर्शनासाठी लाखोंचा जनसागर

जय हरी विठ्ठलच्या गजरात दुमदुमली शेंदुर्णी

■ शेंदुर्णी । वार्ताहर

आषाढी एकादशीच्या निमित्ताने प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेंदुर्णी नगरीत श्री त्रिविक्रम महाराजांच्या दर्शनासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली. रात्रीपासूनच विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल च्या गजरात संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

रात्री १२ वाजता त्रिविक्रम महाराजांची शास्त्रोक्त मंत्रोच्चारात महापूजा संपन्न झाली. या पूजेसाठी मुख्याधिकारी विवेक धांडे, अमृत खलसे, युवराज सूर्यवंशी, केतकी पाटील, पवन अग्रवाल, शिवराज गरुड, अतुल संघवी, अक्षय अंबडकर आदी मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक महाआरती करण्यात आली.

पूजा विधी मंदिराचे मुख्य पुजारी भूषण देवकर, शिरीष देवकर, देवेंद्र पारळकर, अरुण जोशी, जयवंत पिसे, विजय पाठक, ज्ञानेश जोशी यांनी पार पाडले. पूजनानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले आणि दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या.

भाविकांची अलोट गर्दी आणि दिंड्यांचे आगमन

मंदिर परिसरापासून सोयगाव रोडवरील पाण्याच्या टाकीपर्यंत आणि दुसऱ्या बाजूला मेणगाव रोडपर्यंत महिला व पुरुषांच्या स्वतंत्र आणि शिस्तबद्ध रांगा लागल्या होत्या. शेंदुर्णी परिसरातील खेड्यापाड्यांतून मोठ्या संख्येने वारकऱ्यांच्या दिंड्या दाखल झाल्या होत्या.

सेवाभावाने सजलेली शेंदुर्णी

यावेळी गावातील विविध संस्था, मंडळे आणि सेवाभावी नागरिकांनी जागोजागी फराळ, केळी, दूध, चहा, पाणी यांचे वाटप करून भक्तांची सेवा केली. प्रभात फेरी भक्त मंडळ, बजरंग बली भक्त मंडळ, बालाजी मित्र मंडळ, साईदीप कापड दुकान, साई श्रद्धा मित्र मंडळ, बजरंग दल, स्वामी समर्थ केंद्र, पारस पतसंस्था, राणी लक्ष्मीबाई पतसंस्था, बाल युवक गणेश मंडळ, लोकप्रिय दुर्गोत्सव मित्र मंडळ, जनसेवा मित्र मंडळ, सरकारी दवाखाना व्यापारी ग्रुप, अहिल्यादेवी मित्र मंडळ, गांधी चौकाचा राजा मित्र मंडळ, आई रेणुका मित्र मंडळ, राहुल डेअरी, साई रतन एजन्सी, अतुल टी मित्र परिवार, माऊली मित्र मंडळ, संत माधव बाबा भक्त मंडळ, संत गोरोबा मित्र मंडळ, अशोक मिस्तरी, गोविंद बारी, गजानन भक्त मंडळ आदी संस्थांनी आपापल्या पातळीवर सेवा देत मोठा सहभाग नोंदवला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे मोफत चप्पल सुविधा आणि पार्किंग व्यवस्था पुरविण्यात आली. आरोग्यवर्धिनी केंद्र शेंदुर्णी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सेवा भारती (देवगिरी प्रांत, भुसावळ), महालक्ष्मी हॉस्पिटलतर्फे आरोग्य केंद्र उभारण्यात आले.

पोलिसांचा चोख बंदोबस्त

भाविकांच्या सुरक्षेसाठी पहूर पोलीस स्टेशनचे निरीक्षक प्रमोद कठोरे, शेंदुर्णी येथील पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार शिंबरे व त्यांच्या १५० हून अधिक पोलीस सहकाऱ्यांनी गावभर बंदोबस्त ठेवला. कोणताही अनुचित प्रकार घडू न देता अत्यंत शिस्तबद्ध व सुरळीत व्यवस्था सांभाळण्यात आली.

लक्झरी पुलावरुन कोसळली; एक ठार

आमोदा-फैजपूर रस्त्यावर पुन्हा अपघात : १२ प्रवासी जखमी

■ जळगाव । देशदूत चमूकडून

इंदूरहून जळगावकडे जाणारी खासगी ट्रॅव्हल्स फैजपूर-आमोदा रोडवरील मोर नदीच्या पुलावरुन खाली कोसळल्याने १ ठार तर २८ प्रवाश्यांपैकी १२ जखमी झाल्याची घटना ६ जुलै २०२५ रोजी सकाळी ६.१५ वाजता घडली.

श्री गणेश ट्रॅव्हल्स बस क्रमांक एम.पी.०९ पी.९००९ इंदूरवरुन जळगावकडे दि.६ जुलै रोजी आमोदा पुलावरुन खाली कोसळली. मोरनदीमध्ये नदीला पाणी नसल्याने मोठा अनर्थ टळला. ट्रॅव्हलमध्ये २८ जण होते त्यातील १ महिलेचा मृत्यू झाला. १२ जण जखमी आहेत. आमोदा येथील मोरनदीवरील पुलावरुन श्री गणेश ट्रॅव्हल बॅरिकेट तोडून नदीत कोसळली. घटनास्थळी आमोदा येथील ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेतली त्यानंतर त्यांनी बचावकार्य सुरू केले. काही वेळात ॲम्बुलन्स पोहोचल्यावर घटनेतील जखमींना फैजपूर येथे दाखल करण्यात आले. तत्काळ डॉ.शैलेश खाचणे यांनी जखमींवर उपचार सुरु केले. अमोदा ग्रामस्थांनी ट्रॅव्हलमध्ये असलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. हे सर्व प्रवासी इंदोर येथे धार्मिक कार्यासाठी जळगाव येथून आठ दिवसांपूर्वी गेलेले होते. मृत महिलेचे नाव फरीदा इझी (वय ६५) असे आहे. सर्व प्रवासी हे बोहरी समाजाचे होते.

गेल्या महिन्याभरातील आमोदे-पिंपरुडदरम्यान सारखी अपघाताची मालिका तयार झाली आहे या वळणावर अपघाताच्या घटना घडत आहे त्याठिकाणी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेणे गरजेचे आहे. सदर अपघाताच्या घटनास्थळी आ.अमोल जावळे यांनी भेट दिली. फैजपूर पोलीस स्टेशनचे ए.पी.आय रामेश्वर मोताळे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना फैजपूरच्या खासगी दवाखान्यात दाखल केले.

आ.अमोल जावळे यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

यावल । श्री गणेश लक्झरी खासगी बस पुलाखाली कोसळून भीषण अपघात झाला. अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच आ.अमोल जावळे यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन अपघातग्रस्त बसची पाहणी केली व प्रवाशांची विचारपूस केली. गेल्या काही महिन्यांपासून याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने त्यांनी हा प्रश्न अत्यंत गांभीर्याने घेतला. आ.अमोल जावळे यांनी सावदा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता विश्वानंद तायडे यांना घटनास्थळी बोलावून, याठिकाणी वारंवार अपघात का होत आहेत? याची सविस्तर माहिती घेतली. रस्त्याच्या रचनेतील तांत्रिक त्रुटी, चुकीचे वळण, साईन बोर्ड व रिफ्लेक्टरची कमतरता, तसेच सुरक्षात्मक कठड्यांची आवश्यकता यांचा सर्वांगीण आढावा त्यांनी घेतला. या पार्श्वभूमीवर आ.जावळे यांनी अधिकाऱ्यांना पुढील आठ दिवसांत ठोस उपाययोजना करून सुरक्षेची हमी द्यावी. अन्यथा याप्रकरणी गाठ माझ्याशी आहे, असा स्पष्ट इशाराही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत दोंडाईचा खेळाडूंना तीन सुवर्णपदक

■ दोंडाईचा । श.प्र.

किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन, वाको इंडिया किक बॉक्सिंग फेडरेशन, मिनिस्ट्री ऑफ युथ अफेरस ॲण्ड स्पोर्ट्स भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने पुणे येथील हिंजेवाडी विठ्ठल लॉन्स येथे ऑल राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यात दोंडाईचा येथील किक बॉक्सर खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले यात प्राजक्ता भदाणे सुवर्णपदक, गौरव मराठे सुवर्णपदक, अभय देवरे सुवर्णपदक, चिराग पवार रोप्यपदक, मयुरी महाजन कांस्यपदक, राजवर्धन भदाणे कांस्यपदक मिळविले. विजय झालेले खेळाडूंची निवड राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी झाली आहे. या विद्यार्थ्यांना डॉ. जितेंद्र भदाणे यांचे मार्गदर्शन लाभले. विजय खेळाडूंचे अभिनंदन राजश्री भदाणे, रुपेश देवरे, अमृत पवार, सागर मराठे, भरत महाजन यांनी केले आहे.

गांधीतीर्थ स्पर्धेत कस्तुरबा विद्यालय सन्मानीत

■ चोपडा । प्रतिनिधी

गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता स्पर्धेत शहरातील कस्तुरबा माध्यमिक विद्यालयाची राज्यातून उल्लेखनीय विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील गांधी विचार संस्कार परीक्षामध्ये सहभाग नोंदविलेल्या २५२ शाळांनी सहभाग नोंदवला होता. या शाळांमधून स्वच्छतेच्या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या अंतिम मूल्यांकनात ४८ शाळांची निवड झाली.त्यातून ३७ शाळांची विशेष पुरस्कारासाठी निवड होऊन महाराष्ट्र राज्य सल्लागार परिषदेचे सदस्य अनिल बोरणारे यांच्या हस्ते कस्तुरबा विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एल.पाटील व समन्वयक शिक्षक जयेश पाटील यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त तथा जैन इरिगेशन सिस्टीमचे अध्यक्ष अशोक जैन, विनोद बोधनकर, सीईओ मीनल करनवाल, स्पर्धा समन्वयक गिरीश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.जळगाव येथील जैन हिल्सवरील कस्तुरबा सभागृहात हा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी व्ही.पी.पाटील, वरिष्ठ लिपीक राहुल साळुंखे, राकेश सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांनी केले होते. गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेत कस्तुरबा विद्यालयाला विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, पदाधिकारी डॉ. स्मिताताई पाटील तसेच शाळेचे शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

पटेल महाविद्यालयाच्या बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांचे यश

■ शिरपूर । प्रतिनिधी

आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने विद्यापीठाच्या बी.कॉम. पदवी परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत महाविद्यालयाचा गौरव वाढवला आहे. शैक्षणिक गुणवत्ता, योग्य मार्गदर्शन व शिस्त यांच्या जोरावर आर. सी. पटेल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या वर्षीही उत्तुंग शैक्षणिक शिखर गाठले आहे. बी.कॉम. प्रथम वर्ष शर्मा स्नेहा कैलास (सीजीपीए ९.७७) महाविद्यालयात प्रथम क्रमांक, सैंदाणे हर्षदा सतीश (सीजीपीए ९.५६) द्वितीय, हिरे हेमांगी कैलास (सीजीपीए ९.५५) तृतीय क्रमांक प्राप्त केला. बी.कॉम. द्वितीय वर्ष माळी प्रांजल उत्तम (सीजीपीए ९.७१) प्रथम, पावरा विजय दिनेश (सीजीपीए ९.५६) द्वितीय, भट चेतना अनिरुद्ध (सीजीपीए ९.५२) तृतीय क्रमांक प्राप्त केला. बी.कॉम. तृतीय वर्ष कोटकर सायली किरण (सीजीपीए ९.५६) प्रथम, गुरव दीक्षित प्रमोद (सीजीपीए ९.५४) द्वितीय, माळी सुचिता ईश्वर (सीजीपीए ९.२३) तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. शुभांगी पिंगळे यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रा. आदेश जैन, प्रा. अशोक तिर्थाप, प्रा. प्रतिमा श्रावगी, प्रा. शबनम पिंजारी, प्रा. पियुष सोनार, प्रा. कामिनी चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

सोमवार, दि. ७ जुलै २०२५

--* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

मेष – शारीरिक अस्वस्थता निर्माण होईल.
वृषभ – संसारात आनंददायक वातावरण राहील.
मिथुन – विद्यार्थीवर्गास अती उत्तम दिवस असेल.
कर्क – गुरुजनांना उत्तम दिवस असेल.
सिंह – आई-वडिलांच्या आठवणीत राहाल.
कन्या – खूप कामे उपलब्ध होतील.
तूळ – आर्थिक योग उत्तम आहेत.
वृश्चिक – मनातील इच्छा पूर्ण होतील.
धनू – मनावर दडपण येईल.
मकर – सर्वसाधारण दिवस असेल.
कुंभ – वडील सोबत तर भाग्य सोबत.
मीन – नको ते लोक भेटतील.

श्रीक्षेत्र ओंकारेश्वर मंदिरावर भाविकांची अलोट गर्दी

■ रावेर । प्रतिनिधी

अतिशय पुरातन तीर्थक्षेत्र ओंकारेश्वर मंदिर येथे आषाढी एकादशीनिमित्त पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांची अलोट गर्दी झाली. हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा असे साकडे घालून भाविकांनी चांगला पाऊस, हंगामासाठी प्रार्थना केली.

मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय पाटील यांच्या हस्ते सपत्नीक सकाळी ४ वाजता शिव अभिषेक व विठ्ठल - रुख्मिणी यांच्या मूर्तीला जल, फल, व पुष्प माला अर्पण करण्यात आली. पूजा, आरतीनंतर दिवसभर भाविकांची दर्शन घेतले. गैरसोय टाळण्यासाठी स्वतंत्र दर्शनबारीची सोय होती. याठिकाणी मंदिर परिसरात प्रशस्त जागा असल्याने भाविकांची गैरसोय टळली. सकाळी ११ वाजेनंतर तालुकाभरातील दिंड्यांचे आगमन मंदिरस्थळी सुरू झाले. मुख्य सहभागृहात कीर्तन व भजन झाले. मंदिर प्रशासनाने येणाऱ्या सर्व दिंडी प्रमुखांचा सत्कार करण्यात आला. दर्शन व वारकऱ्यांच्या भजनानंतर रमेश महाराज सुसरीकर यांचे कीर्तन झाले. भाविकांना फराळासाठी केऱ्हाळे येथील महेंद्र पाटील यांनी दोन क्विंटल, तर खानापूर येथील के.एस.भारते यांनी ५० किलो व इतर मिळून साडेचार क्विंटल साबुदाणा खिचडी फराळ साठी उपलब्ध केली. रावेर येथील भागवत सातव व नीलेश खडायते राजू पाटिल निंबोल यांनी केळी व राजगिरा वाटप केला. पोलिस प्रशासनातर्फे, होमगार्ड, स्वयंसेवक व सहकाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला.

आषाढीनिमित्त टाकरखेडा येथे रक्तदान शिबिर

टाकरखेडा, ता.अमळनेर । वार्ताहर । देवयानी आषाढी एकादशी निमित्त जिवन ज्योती श्री ब्लड सेंटर अमळनेर आणि जीवन ज्योती ब्लड सेंटर धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरीत गावातील १४ दात्यांनी रक्तदान केले. त्यात जितेंद्र भगवतीराव पाटील,किरण दगा पाटील,धनराज पुंडलिक पाटील,रवींद्र अभिमान कोळी,प्रकाश परशुराम कोळी, वाल्मीक मच्छिंद्र पाटील,दीपक खुशाल पाटील,अशोक दादासाहेब पाटील,करण राजेंद्र पाटील,शिवलाल धर्मा पाटील,कैलास विजय पाटील, गोरख उत्तम कुंभार,दीपक गोरख पाटील व धीरेंद्र पाटील यांनी रक्तदान करून शिबिरात सहभाग नोंदविला. यावेळेस योगेंद्र महाले जनसंपर्क अधिकारी,जगदीश सोनार लॅब असिस्टंट आणि सुनिता गावित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला सहभागी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)